Room
Kadam Sir

भारतीविद्यापीठपोलीस ठाणे, पुणे
दि. १५/०५/२०१९

# हरविलेली महिलेचा शोध घेऊन तिच्या पतीच्या ताब्यात दिलेबाबतची उल्लेखनिय कामगीरी

दि. १२/०५/२०१९ रोजी १७.३० वाजणेच्या दरम्यान भारती विद्यापीठ पोलीस ठाणे हद्दीतील कात्रज पठार चौकी दिवसपाळी चौकी अंमलदार पोहवा ३६५९ मोढवे, व मदतणीस पोशि ८७५१ खाडे असे चौकीस असताना, इसम नामे बाळासाहेब जगताप, वय-५५ वर्षे रा. अंजनी निवास, आबेगांव बुद्रुक यांनी समक्ष चौकीस येऊन सांगितले की, त्यांनी पत्नी नामे सौ. कौशल्या बाळासाहेब जगताप, वय-४८ वर्षे रा. सदर त्यांचे मुळ गांवी वेल्हा ता. वेल्हा जिल्हा पुणे येथे लग्नाहुन परत पुणे येथे आलो असता, माझ्या पत्नीस मी बस स्टॉप येथे उतरुन दुकानात खरेदी करण्याकरीता गेलो असता, माझी पत्नी कुठेतरी निघुन गेलेली असुन ती मिळुन येत नसल्याबाबत सांगितले.

नमुद वेळी रात्रपाळीवरील बिट मार्शल पोशि ७६६२ सुळ, पोशि ७२८२ हेमंत धायगुडे, चौकी अंमलदार पोहवा ३६५९ मोढवे, व मदतणीस पोशि ८७५१ खाडे यांनी नमुद महिलेच्या पतीकडुन त्याचे पत्नीचा मोबाईलमधील फोटो घेऊन पोलीस चौकी हद्दीत तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्याकडील वॉट्अपग्रुपवर नागरिकांना पाठविला. तसेच बिट मार्शलही महिला हरविले ठिकाण व रहाते ठिकाण यामध्ये गस्त घालुन नमुद महिला मिळुन येणेकामी पेट्रोलिंग करता असताना, नमुद महिला तिचे घरी जात असताना मिळुन आली.

नमुद महिलेस पोलीस चौकीस आणुन याबाबच अधिक विचारणा करता तिने सांगितले की, आमचे गावी लग्नाकरता गेलो असता, कात्रज येथे आल्यानंतर माझे पती दुकानात सामान व मंडईमध्ये भाजी घेण्याकरीता गेले असता, बराच वेळ आले नसल्याने मी घाबरुन त्यांचा शोध घेण्याकरीता भाजी मंडईमध्ये गेले असता, ते मिळुन न आल्याने मी माझे घरी चालले होते. नमुद महिलेस चौकी अंमलदार पोहवा ३६५९ मोढवे, व मदतणीस पोशि ८७५१ खाडे, बिट मार्शल पोशि ७६६२ सुळ, पोशि ७२८२ हेमंत धायगुडे यांनी त्याचे पतीचे ताब्यात दिले

सदर कामगीरीबाबत चुकलेल्या महिलेचे पती नामे बाळासाहेब जगताप यांनी समाधान व्यक्त करुन पोलिसांचे आभार मानलेले आहे.

(विष्णु शं. पवार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर